पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**क क्षेत्रीय कार्यालय**

कार्यपत्रिका क्रमांक-१३

**(सभापती निवडीची सभा)**

सभावृत्तांत

दि.- ०६/०२/२०१४ वेळ- दुपारी १:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समितीच्या सभापती निवडीची विशेष सभा गुरुवार दिनांक ०६/०२/२०१४ रोजी दुपारी १.०० वाजता यशवंतराव चव्हाण सभागृह, (मा.महापालिका सभागृह ) पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी १८ येथे **मा.श्री.गणेश पाटील, पिठासीन अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी,पुणे** यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करणेत आली होती . सभेस खालील सन्मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) मा.पालांडे सुजाता सुनिल
२) मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
३) मा.गिता सुशिल मंचरकर
४) मा.शितोळे शैलजा बाबुराव
५) मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
६) मा.अतुल अरविंद उर्फ नानासाहेब शितोळे
७) मा.जम सोनाली पोपट
८) मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
९) मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
१०) मा.मोटे किरण बाळासाहेब
११) मा.संजय केशवराव काटे

याशिवाय मा.दत्तात्रय फुंदे- क्षेत्रीय अधिकारी, श्री. रामकिसन लटपटे-प्रशासन अधिकारी तथा सचिव क क्षेत्रीय कार्यालय हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------

प्रथम क्षेत्रीय अधिकारी श्री.डी.एम.फुंदे यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन दिनांक ०५/०२/२०१४ रोजी विहीत मुदतीत प्राप्त झालेले एक नामनिर्देशन पत्र वाचून दाखविले व पिठासिन अधिकारी यांचेकडे सुपूर्द करुन पुढील कार्यवाही सुरु करणेबाबत विनंती केली. सदर एक नामनिर्देशन पत्रामधील उमेदवारांचे सुचक व अनुमोदक खालील प्रमाणे होते.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | सुचक | अनुमोदक |
|---|---|---|---|
| १) | जम सोनाली पोपट | सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र | शितोळे शैलजा बाबुराव |

वरीलप्रमाणे क प्रभाग समिती सभापती पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात आली व ते वैध ठरवण्यात आले. त्यामध्ये मा. क प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे मा. जम सोनाली पोपट या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत. त्यानंतर उमेदवारी अर्ज मागे घेण्याकरिता दुपारी १.०५ ते १.२० असा १५ मिनीटांचा अवधी देणेत आला. सदर कालावधीमध्ये उमेदवारांनी उमेदवारी माघारीचा अर्ज दिला नाही.

ठराव क्रमांक-११७ विषय क्रमांक- १
दिनांक- ६/२/२०१४ विभाग- क प्रभाग प्रशासन
सुचक-मा.तनपुरे सुषमा राजेंद्र अनुमोदक-मा.शितोळे शैलजा बाबुराव

क प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे मा. जम सोनाली पोपट या एकच रितसर वैधरित्या नामनिर्देशित उमेदवार असल्याने मा. जम सोनाली पोपट यांची क प्रभाग समितीचे सभापती पदावर बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करणेत येत आहे.

सही/-
( गणेश पाटील)
पिठासीन अधिकारी तथा
अप्पर जिल्हाधिकारी पुणे.

त्यानंतर नवनिर्वाचित **सभापती मा. जम सोनाली पोपट** यांचे अध्यक्षतेखाली विषयपत्रिकेवरील इतर विषय खालीलप्रमाणे मंजूर करणेत आले.

ठराव क्रमांक- ११८
दिनांक- ६/२/२०१४
सुचक- मा.सुजाता पालांडे

विषय क्रमांक- २
विभाग- क प्रभाग प्रशासन
अनुमोदक-मा. काटे राजेंद्र

क प्रभाग समितीच्या मासीक सभेचा दिनांक व वेळ निश्चित करणे.

क प्रभाग समितीची मासिक सभा ही प्रत्येक महिन्याचे **पहिल्या बुधवारी दु. ३.०० वा.** ( पहिल्या बुधवारी सार्वजनिक सुट्टी / सुट्टया असेलतर दुस-या दिवशी) क क्षेत्रीय कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

वरीलप्रमाणे सभेचे कामकाज होऊन नवनिर्वाचित **सभापती मा. जम सोनाली पोपट** यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

सही /-
(जम सोनाली पोपट)
सभापती
क प्रभाग समिती, भोसरी-२६

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - २६
क्र-कक्षेका/कावि/ ६९२ /२०१४
दिनांक- ६/२/२०१४



प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)
**( क क्षेत्रीय कार्यालय)**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका